# चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

URGENT

Email : rch.chandrapur@yahoo.com Ph. No. 07172-250220, 273856

क्रमांक : चंशमनपा/आरोग्य विभाग/ ९८० /२०२० दिनांक : १४/०८/२०२०

## आदेश :-

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासुन लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणुने उदभ्वणाऱ्या संसर्गजन्य रोगांचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी महाराष्ट्र Covid-19 उपाय योजना नियम, २०२० यातील नियम ३ नुसार, शहरी भागात आयुक्त महानगरपालिका चंद्रपुर यांना सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे व त्यांना कार्यक्षेत्रातील Covid-19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी ते सक्षम असतील असे जाहीर केले आहे.

ज्याअर्थी या कायद्याच्या नियम १० अन्वये, आयुक्त महानगरपालिका यांना Covid-19 चा प्रादुर्भाव रोखण्याकरीता आवश्यक उपाययोजना करण्याकरता अधिकृत करण्यात आले आहे.

ज्याअर्थी चंद्रपुर महानगरपालिका हद्दीतील **सुमित्रा नगर, हरदेव किराणा स्टोअर्स समोर, दे.गो. तुकुम प्रभाग क्र. १** या भागात कोरोना बाधित रुग्ण आढळून आल्याने व त्याचा प्रादुर्भाव शहरातील इतर भागांत पसरु नये याकरिता सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने तसेच शहरातील नागरीकांचे हीत व सुरक्षेस्तव संदर्भीय आदेशाच्या अनुषंगाने अधिकच्या आवश्यक उपाययोजना तातडीने करणे आवश्यक आहे अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी चंद्रपुर शहर महानगरपालिका हद्दीतील **दे.गो. तुकुम प्रभाग क्र. १** भागातील निश्चित केलेला कंटेनमेंट एरिया प्रपत्र नकाशाप्रमाणे व दिशांबाबत खालील तपशील प्रमाणे भाग पुढील आदेशापर्यंत प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात येत आहे.

- पुर्व : **A - B** – श्री. बिस्मिल्ला शेख नजिर यांचे घरापासून ते श्रीमती रसिका खांडारकर यांचे घरापर्यंत
- पश्चिम : **B – A** - श्रीमती रसिका खांडारकर यांचे घरापासून ते श्री. बिस्मिल्ला शेख नजिर यांचे घरापर्यंत

सदर भागात येणारे जाणारे सर्व मार्ग तात्काळ बंद करुन सदर भागाच्या सीमा (हद्दी) आवागमनासाठी बंद करण्यात येत आहे. सदर भागातील नागरिकांना प्रतिबंधित क्षेत्राचे बाहेर जाण्यास व प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील नागरिकांना सदर क्षेत्रात येण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.

Scanned with CamScanner

सदर आदेश निम्नलिखित बाबींकरता लागू राहणार नाही.

१. शासकीय व निमशासकीय सेवेतील अत्यावश्यक सेवेत कार्यरत असणारे अधिकारी कर्मचारी
२. आवश्यक तातडीची वैद्यकीय कारणे तसेच अंत्यविधी
३. वैद्यकीय सेवशी संबंधित खासगी डॉक्टर्स, नर्स, मेडिकल स्टोअर्स दुकानदार, पॅथॉलॉजिस्ट, रुग्णवाहिका इ.
४. जीवनावश्यक वस्तुंचा सेवा पुरवठा करणारे व्यक्ती (पास धारक)
५. जीवनावश्यक वस्तूंशी संबंधित सेवा

मा. पोलीस अधीक्षक चंद्रपूर यांनी सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी तसेच सर्व संबंधितांकडुन सोशल डिस्टन्सिंग बाबत नियमांचे पालन होईल याची दक्षता घ्यावी.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी महानगरपालिका चंद्रपूर यांनी सदर आदेशाप्रमाणे कंटेनमेंट एरियामध्ये अनुषंगिक आवश्यक कार्यवाही तातडीने करावी.

**(राजेश मोहिते)**
आयुक्त
महानगरपालिका चंद्रपूर

**प्रतिलिपी आवश्यक कार्यवाहिस्तव** :

१. मा. पोलीस अधीक्षक, चंद्रपूर जिल्हा
२. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, चंद्रपूर
३. सहाय्यक आयुक्त झोन क्रमांक १ उपरोक्तप्रमाणे आवश्यक पर्यवेक्षण व अनुषंगिक कार्यवाहीस्तव
४. अन्नधान्य वितरण अधिकारी, चंद्रपूर
५. इंसिडेन्ट कमांडर (कोवीड-१९) तथा जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, चंद्रपूर
६. वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका चंद्रपुर

**प्रत महितीस सविनय सादर** :

१. माननीय विभागीय आयुक्त नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर
२. मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर
3- मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद चंद्रपूर

Scanned with CamScanner




**सुमित्रा नगर, दे.गो. तुकुम**
**प्रभाग क्र. १, चंद्रपुर**

- पुर्व : A - B - श्री. बिस्मिल्ला शेख नजिर यांचे घरापासून ते श्रीमती रसिका खांडारकर यांचे घरापर्यंत
- पश्चिम : B – A - श्रीमती रसिका खांडारकर यांचे घरापासून ते श्री. बिस्मिल्ला शेख नजिर यांचे घरापर्यंत

आरोग्य विभाग

Scanned with CamScanner